दाखल तारीख : १५.०३.२०१९.
नोंदणी तारीख : १५.०३.२०१९.
निकाल तारीख: २४.०९.२०१९.
कालावधी : वर्ष महिना दिवस
००   ०६   ०९

**अलिबाग येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, यांचे न्यायालयात, जिल्हा : रायगड**

{पिठासीन अधिकारी अ. अ. मेहेंदळे}

**<u>हिंदु विवाह अर्ज क्र. ७५/२०१९.</u>**    **<u>निशाणी क्र.९/अ</u>**

१. सौ. दामिनी राहूल जाधव ,  }
उ.व. :- २५ वर्षे, व्यवसाय :- गृहिणी ,  }
रा. द्वारा समिधा संजय भोसले  }
रा. खडकआळी, पाली, ता. सुधागड  }
जिल्हा - रायगड.  } .. <u>अर्जदार क्र.१</u>.

**:: <u>आणि</u> ::**

२. श्री. राहुल यशवंत जाधव  }
उ.व.२९, व्यवसाय :- नोकरी,  }
रा. बिल्डींग नं. ५६ च्या समोर, गणेश गल्ली,  }
वर्तक नगर, भिम नगर, पोखरण रोड नं. २  }
ठाणे पश्चिम  } .. <u>अर्जदार क्र.२</u>.

**<u>विरुध्द</u>**

कोणी नाही ......  } .. सामनेवाला.

**<u>वकिलपक्ष</u> :-**

श्रीमती. अक्षरा मिलिंद देशमुख, वकिल अर्जदार क्र.१ व २ करीता.

हिंदु विवाह कायदा कलम १३-ब प्रमाणे आपसात संमतीने

विवाह विच्छेदन करुन मिळणेसाठी अर्ज.

## :: न्यायनिर्णय ::

{दिनांक २४ सप्टेंबर, २०१९ रोजी पारीत}

०१. हिंदु विवाह कायदा १९५५ चे कलम १३–ब अन्वये आपसात संमतीने विवाह विच्छेदन करुन मिळण्याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०२. अर्जदार क्र.१ – सौ. दामिनी व अर्जदार क्र.२ – श्री. राहुल यांच्या संयुक्त कथनानुसार त्यांचा हिंदु रिवाजाप्रमाणे मौजे. महालक्ष्मी हॉल, पाली, ता. सुधागड, जिल्हा रायगड येथे दि.२७.०४.२०१५ रोजी विवाह झाला. परंतु, विवाहानंतर दोघांतील वैचारीक मतभेदांमुळे वाद विवादास सुरुवात झाली. दोघांनीही आपसात तडजोड करण्याचा प्रयत्न करुन देखील त्यांना पती–पत्नी म्हणुन एकत्र संसार करणे अशक्य झाले. अर्जदार व जाबदार हे जून २०१५ पासून विभक्त राहत आहेत. अशारितीने दोघांना एकत्र संसार करणे अशक्य झाल्यामुळे त्यांनी संमतीने घटस्फोट देण्याचे आणि घेण्याचे ठरवून प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्ज दि. १५.०३.२०१९ रोजी दाखल करण्यात आला. त्यानंतर, दोन्ही अर्जदारांना त्यांच्या कायदेशीररित्या विभक्त होण्याच्या निर्णयावर फेरविचार करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली. त्यानंतर, दि. २४.०९.२०१९ रोजी अर्जदार क्र.१ व २ यांनी अनुक्रमे नि.क्र.६ व ७ वर पुराव्याची शपथपत्रे दाखल केली. नि.८ कडे अर्जदार क्र.१ व २ यांनी तोंडी पुरावा संपलेची पुरशीस दाखल केली.

०४. दोन्ही अर्जदारांचे म्हणणे ऐकण्यात आले.

०५. उभय पक्षकारांचे म्हणणे विचारात घेवुन खालील मुद्दा विचाराधीन घेण्यात आला. सदरचा मुद्दा आणि त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अनु.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार क्र.१ व २ एकमेकांचे संमतीने घटस्फोटाचा हुकुमनामा मिळणेस पात्र आहेत काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ०२. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र. १ बाबत** :-

०६. अर्जदार क्र.१ व २ यांनी अनुक्रमे नि.क्र. ६ व ७ वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन मुळ अर्जातील मजकुर उध्दृत केला. सदर दोन्ही अर्जदारांच्या शपथेवरील कथनानुसार, त्यांच्यातील असलेला स्वभाव भिन्नता व वैचारिक भिन्नता असलेले मतभेदांमुळे त्यांच्यामध्ये दुरावा वाढत गेला. अर्जदार व जाबदार हे जून २०१५ पासून विभक्त राहत आहेत. अशा रितीने, दोघांनाही एकत्र संसार करणे अशक्यप्राय झाल्यामुळे त्यांनी स्वेच्छेने फारकत घेण्याचे निश्चित केले.

०७. दोन्ही अर्जदारांनी दाखल केलेल्या वरील पुराव्याच्या शपथपत्रातील सत्यता पडताळुन पाहिली असता, दोघेही फारकत घेण्याच्या त्यांच्या निर्णयावर ठाम असल्याचे दिसुन आले. अशारितीने, संमतीने विवाह विच्छेदन करुन घेण्याच्या निर्णयावर दोन्ही अर्जदार ठाम असल्यामुळे ते एकत्रपणे संसार करु शकतील अशी शक्यता दिसून येत नाही. अर्जदार व जाबदार हे जून २०१५ पासून विभक्त राहत आहेत. अशारितीने, हिंदु विवाह कायदा कलम १३–ब मधील तरतुदींची पुर्तता झाल्यामुळे अर्जदार क्र.१ आणि २ हे एकमेकांच्या संमतीने घटस्फोटाचा हुकुमनामा मिळविणेस पात्र ठरतात. परिणामी, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत** :-

०८. मुददा क्र.१ चा होकारार्थी निष्कर्ष पाहता प्रस्तुत अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## :: आदेश ::

०१. प्रस्तुत अर्ज खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार क्र.१ – सौ. दामिनी राहूल जाधव, व अर्जदार क्र.२ – श्री. राहुल यशवंत जाधव, यांचा दिनांक २७.०४.२०१५ रोजी संपन्न झालेला विवाह, हिंदु विवाह कायदा कलम १३–ब प्रमाणे रद्द करण्यात येत आहे.

०३. प्रचलित नियमाप्रमाणे अर्जदार व सामनेवाला यांना न्यायनिर्णयाच्या प्रती मोफत देण्यात याव्यात.

०४. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

अलिबाग.
दि.२४.०९.२०१९.

**{अ. अ. मेहेंदळे}**
४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, अलिबाग.